# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४३ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

* सूर्याच्या उत्तरायणास प्रारंभ.

१९३४ : डॉ.आंबेडकरांना आपले आडनाव देणाऱ्या गुरुवर्य कृष्णाजी केशव आंबेडकरांचे निधन झाले.

१९४५ : शाहीर पठ्ठे बापूराव यांचा मृत्यू.

१९४५ : शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंग यांचा जन्म.

१९७५ : संगीतकार वसंत देसाई यांचा मृत्यू.

सेन्सेक्स ८४,९२९.३६ +४४७.५५ (०.५३%)

डॉलर ₹ ८९.५८

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १२ |
| दिल्ली | १९ | ११ |
| मुंबई | ३४ | १७ |
| नागपूर | २७ | ०८ |
| पुणे | २९ | ०७ |

### सुविचार

शिक्षण ही यशाची गुरुकिल्ली आहे, तिचा योग्य उपयोग करा.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-७:०१ संध्या-५:५२

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,३५,९९०/- २,१४,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

# भाजपाच नंबर एकचा पक्ष : मुख्यमंत्री

## नगरपरिषदेच्या निकालानंतर देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील २८८ नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकींचा निकाल आज जाहीर होत आहेत. या निवडणुकीत महायुतीचा त्यातही भाजपाचा मोठा विजय झाल्याचे दिसून येत आहे. तब्बल २०० हून अधिक नगरपालिकांवर महायुतीला विजय मिळाला असून भाजपाने १०० हून अधिक नगरपालिका, नगरपरिषदा आपल्या ताब्यात घेतल्या आहेत.**



निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले असून महाराष्ट्राच नंबर वन पक्ष भाजपाच असल्याचे म्हटले आहे.

माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानतो. राज्याच्या जनतेने भाजपाला आणि आमच्या महायुतीला प्रचंड समर्थन दिले आहे. मी यापूर्वीच भाकीत केले होते. निवडून येणाऱ्या एकूण नगराध्यक्षांपैकी ७५ टक्के नगराध्यक्ष हे महायुतीचे असतील. त्याचप्रकारचा कल राज्याच्या जनतेने दिला. तसेच भाजपाच प्रथम क्रमाकांचा पक्ष असल्याचे अधोरेखित झाले आहे. भाजपाचे जवळपास १२९ नगराध्यक्ष निवडून आले आहेत. तसेच महायुतीचे ७५ टक्के नगराध्यक्ष आहेत.'

नगरसेवकांच्या बाबतीत भाजपाने यावेळी विक्रम केला, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. आकडेवारी देताना ते म्हणाले, २०१७ साली आमचे १६०२ नगरसेवक होते. आता त्याच्या दुपटीने जास्त म्हणजे ३३२५ नगरसेवक निवडून आले आहेत. नगरसेवकांच्या संख्येमध्ये एकट्या भाजपाचे ४८ टक्के नगरसेवक आहेत. प्रचंड मोठे जनसमर्थन आम्हाला मिळाले आहे.

आमचे सहयोगी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही अभिनंदन करतो. त्यांच्याही पक्षाने चांगली कामगिरी केली आहे.

विधानसभेच्या कामगिरीची यानिमित्ताने पुनरावृत्ती झाली आहे, असे ते म्हणाले. ङ्कङ्कआमचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची ही पहिलीच निवडणूक होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाला घवघवीत यश मिळाले आहे. त्यामुळे त्यांचेही अभिनंदन करतो. आमचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर नेत्यांनी योग्य असा समन्वय राखला. त्यामुळे आमचा २०१७ पेक्षाही मोठा विजय मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

### ➢ यंदा फक्त विकासावर बोलून जिंकलो

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, 'गेल्या २०–२५ वर्षांत महाराष्ट्राच्या इतिहासात इतका मोठा विजय कुणालाही मिळाला नाही. त्यामुळे मी नागरिकांचे आभार मानतो. या निवडणुकीत मी सकारात्मक प्रचार केला. या निवडणुकीत एकही नेता किंवा पक्षाच्या विरोधात टीका केली आहे. आम्ही केवळ विकासावर मते मागितली. आम्ही काय केले आणि काय करणार आहोत, याची माहिती दिली. त्यामुळे भारतातील ही पहिली निवडणूक असेल ज्यामध्ये मुख्यमंत्र्यांनी सूतभरही टीका न करता त्या पक्षाचा विजय होतो.'

### ➢ रवींद्र चव्हाण यांच्यानंतर पुन्हा नंबर वनचा उल्लेख

**भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी निवडणुकीच्या प्रचारावेळी सांगली येथे बोलत असताना नंबर एक आणि नंबर दोन यातील फरक स्पष्ट केला होता. स्व. आर. आर. पाटील यांच्या भाषणाचा संदर्भ देत असताना ते म्हणाले, 'नंबर एक हाच महत्त्वाचा असतो. नंबर दोनला काहीही किंमत नसते. त्यामुळे आपले देवाभाऊ वर बसले आहेत. ते सर्व पाहतील.' रवींद्र चव्हाण यांनी नाव न घेता महायुतीमधील इतर पक्षांना यातून टोला लगावल्याची चर्चा त्यावेळी केली गेली होती. मात्र निवडणुकीनंतर त्यावर फार प्रतिक्रिया कुणीही दिल्या नव्हत्या.**

# रेल्वेचा प्रवास महागला

● जनरल ते एसीपर्यंत तिकीट दरात वाढ



वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**रेल्वेने नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. भारतीय रेल्वेने मेल आणि एक्सप्रेस रेल्वेगाड्यांच्या तिकिट दरात वाढ जाहीर करण्यात आली आहे. ही भाडेवाढ २६ डिसेंबर २०२५ पासून लागू होणार आहे. विशेषतः लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा आर्थिक फटका बसणार आहे.**

रेल्वेने जाहीर केलेल्या नव्या भाडेरचनेनुसार, २१५ किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी सामान्य श्रेणीत कोणतीही भाडेवाढ होणार नाही. त्यामुळे कमी अंतराच्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. २१५ किलोमीटरपेक्षा जास्त अंतरासाठी सामान्य श्रेणीसाठी प्रति किलोमीटर १ पैसा वाढ करण्यात आली असून मेल/एक्सप्रेस नॉन–एसी आणि एसी श्रेणीसाठी प्रति किलोमीटर २ पैसे वाढ लागू होईल. यादरम्यान, ही यंदातील दुसरी रेल्वे भाडेवाढ आहे. याआधी (पान २ वर)

● भाडेवाढीमुळे भारतीय रेल्वेला ६०० कोटींपेक्षा अधिक महसूल मिळण्याची अपेक्षा आहे. रेल्वेने निश्चित केलेल्या नव्या दरानुसार दिल्ली ते मुंबई प्रवासाच्या भाड्याचे गणित मांडल्यास हे अंतर साधारण १३८६ किलोमीटर आहे. सध्या सीएसएमटीराजधानी एक्स्प्रेस मध्ये ३–एसीचे भाडे ३१८० रुपये आहे. यामध्ये २ पैसे प्रति किलोमीटरच्या वाढीनंतर भाड्यात साधारण २७ रुपयांची वाढ होईल आणि तिकिट ३२०७ रुपये होईल.

## थोडक्यात

### निवडणुकीच्या निकालानंतर येवल्यात हाणामारी

**नाशिक ।** जिल्ह्यातील येवला नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक चारच्या निकालानंतर शहरातील मोमीनपुरा भागात तुफान हाणामारी झालेली पाहायला मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या पराभवामुळे हा वाद वाद उफाळल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेचे (शिंदे गट) नगराध्यक्षपदाचे उमेदवार रुपेश दराडे यांच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करण्यात आला आहे. या हाणामारीत तीन पुरुष व एक महिला जखमी झाली आहे. आता सर्व जखमींना येवला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार केला जात आहे. ही घटना समजताच येवला शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांनी तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास चालू करण्यात आला आहे.

### २२ व्या वर्षी तरुणीची नगराध्यक्षपदाला गवसणी

**सोलापूर ।** जिल्ह्यातील मोहोळमध्ये सर्वात तरुण वयाच्या तरुणीने बाजी मारली आहे.मोहोळ मध्ये अनेक मोठ्या सभा झाल्या. त्या सभांमध्ये विरोधकांकडून टीकाही केली गेली.या सर्वांवर मात करत सिद्धी वस्त्रे या तरुणीने सर्वांना चित केले आहे.विरोधकांनी केलेल्या टीकेबद्दल बोलताना सिद्धी वस्त्रे यांनी म्हटलं की...आमचं जे काही उत्तर आहे ते कामातूनच देऊ. आमचं काम हेच टीका.... करणाऱ्यांसाठी उत्तर असणार आहे. मोहोळमध्ये एकनाथ शिंदे यांच्या....शिवसेनेकडून लढणाऱ्या रणरागिणीने अवघ्या २२ व्या वर्षी नगराध्यक्षपद प्राप्त केले आहे. सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या अनुभवी उमेदवार शीतल क्षीरसागर यांचा १७० मतांनी पराभव करत नगराध्यक्षपदाला गवसणी घातली आहे.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा आमदार भाजपाच्या स्टेजवर आल्यानेच पराभव

● गिरीश महाजनांचा आरोप



प्रतिनिधी । जळगाव

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या नगरपंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले. यामध्ये संपूर्ण राज्यभरात भाजपाचा बोलबाला दिसून येत आहे. भाजपा गेल्या वेळीप्रमाणे यंदाही क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. असे असले तरी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाला मुक्ताईनगरमध्ये पराभव स्वीकारावा लागला आहे. रक्षा खडसे यांनी या पराभवाची जबाबदारी स्वीकारली असली तरी, मंत्री गिरीश महाजन यांनी या पराभवासाठी एकनाथ खडसे परिवार जबाबदार असल्याचे म्हटले आहे.दरम्यान, मुक्ताई नगरमध्ये शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) आमदार चंद्रकांत पाटील यांच्या कन्या २ हजारहून अधिक मतांनी नगराध्यक्षपदी विजयी झाला आहे.

हे लोकांना पटणारे नव्हते

याबाबत बोलताना मंत्री गिरीश महाजन (पान २ वर)

# जेजुरीत खंडोबाच्या पायरीवर भंडाऱ्याचा भडका

● नव्या नगरसेविकांसह १६ जण गंभीर

वृत्तसंस्था । पुणे

**जेजुरीत मतमोजणी संपल्यानंतर विजयी जल्लोषाला शोकाची छाया पडेल, अशी धक्कादायक घटना जेजुरीत घडली. खंडोबा गडाच्या पहिल्या पायरीवर भाविक व कार्यकर्त्यांनी भंडारा अर्पण करताना अचानक भीषण भडका उडून किमान १६ जण गंभीर भाजल्याची घटना दुपारी सुमारे ३ वाजता घडली. जखमींमध्ये दोन नव्याने निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविकांसह अनेक महिला, तरुणांचा समावेश आहे.**



घटनेनंतर परिसरात मोठी दहशत निर्माण झाली. क्षणभरात भंडाऱ्याने पेट घेतला आणि जोरदार आवाजासह स्फोट होऊन आजूबाजूचे लोक होरपळले. भाजलेल्या जखमींना तातडीने जेजुरीतील खाजगी तसेच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींना पुढील उपचारासाठी पुण्यात हलविण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

मल्हार नाट्यगृहात मतमोजणी पूर्ण होऊन निकाल जाहीर होताच राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयी उमेदवार, समर्थक व कार्यकर्ते खंडोबाच्या दर्शनासाठी गडाच्या पहिल्या पायरीवर गेले होते. येथे भाविकांनी मोठ्या प्रमाणावर भंडारा उधळताना वापरलेल्या भंडाऱ्याने अचानक पेट घेतला. अत्यंत ज्वालाग्राही घटक मिश्रित असल्यामुळे भडका एकदम मोठा झाला आणि अनेक जण त्यात सापडले. स्फोटासारखा आवाज झाल्यानंतर क्षणात परिसर धुराने व्यापला. काही काळासाठी तिथे प्रचंड घबराट पसरली होती.

भेसळयुक्त भंडाऱ्यावर कठोर कारवाई करणार असल्याचे (पान २ वर)

## निवडणुकीत लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम : यशोमती ठाकूर



**मुंबई –** विधानसभा निवडणुकीपाठोपाठ नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्येही महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे. महायुतीने राज्याच्या सर्वच भागांमध्ये वर्चस्व प्रस्थापित केले आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्षांना फटका बसला आहे. राज्यातील बहुतांश पालिकांमध्ये भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांना यश मिळाले आहे. आता निवडणूक निकालावर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर बोलल्या आहेत. त्यांनी भाजपावर गंभीर आरोप केले आहेत. अंजनगाव सुर्जी निवडणुकीत लोकशाहीचा गळा घोटला गेला असल्याचा आरोप त्यांनी केला. त्या म्हणाल्या, भाजपाकडे सत्ता, प्रशासन, पैसा या सर्व गोष्टी आहेत. त्यांनी किती दमदाटी करून या निवडणुका घेतल्या हे सर्वांना माहित आहे. मात्र, मध्यमांमध्ये दिसते तशी (पान २ वर)

# शिंदखेडा राष्ट्रवादी, पिंपळनेर-शिरपूर नगराध्यक्षपद भाजपाकडे

## शिरपूर नगराध्यक्ष चिंतन पटेल, पिंपळनेर नगराध्यक्षा योगिता चौरे व शिंदखेडा नगराध्यक्षा कलाबाई माळी

प्रतिनिधी । धुळे

**जिल्ह्यात तीन नगर परिषद आणि एक नगर पंचायत निवडणूकीपैकी दोंडाईचा नगराध्यक्षपद आणि सर्वच सदस्य बिनविरोध झाले. उर्वरित तीन ठिकाणी महायुतीत फूट पडल्याने स्वतंत्र उमेदवार देऊन आपली राजकीय ताकद अजमावण्यात आली. यात शिंदखेडा वागळता सर्व तीन ठिकाणी भाजपाने बाजी मारली आहे. शिरपूर येथे एमआयएमचा एक उमेदवार विजयी झाला तर शिंदखेड्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाने नगराध्यक्षपद मिळविले. यामुळे मंत्री जयकुमार रावल यांचा जिल्ह्यात शतप्रतिशत भाजपाचा दावा या निकालाने फोल ठरविला आहे.**



जिल्ह्यातील दोंडाईचा–वरवाडे नगर परिषद ही बिनविरोध निवडणूक झालेली पहिली स्थानिक स्वराज्य संस्था ठरली. यामागे मंत्री जयकुमार रावल आणि माजी मंत्री डॉ. हेमंत देशमुख हे दोन्ही गट एकत्र आल्याचे फलित आहे. यामुळे तेथील निवडणूक बिनविरोध ठरली आणि भाजपचे सर्व २६ नगरसेवक बिनविरोध निवडून आले.याशिवाय लोकनियुक्त नगराध्यक्षपदासाठी भाजपच्या नयन कुंवर रावल यांचीही बिनविरोध निवड झाली. त्या चौथ्यांदा नगराध्यक्षा झाल्या आहेत. गेल्या निवडणुकीत या ठिकाणी १३ वॉर्डमधून २६ नगरसेवक होते. त्यावेळी भाजपचे २०, काँग्रेसचे ३ आणि मनसेचा १ नगरसेवक होता.

पिंपळनेर नगरपरिषद अस्तित्वात आल्यावर याठिकाणी नगराध्यक्ष आणि सदस्य अशा २० जागांसाठी निवडणूक कार्यक्रम निश्चित झाला, दरम्यान एका प्रभागातील सदस्य पदासाठी निवडणूक रिंगणात असलेल्या एका महिला उमेदवाराचा मृत्यू झाला. यामुळे नगराध्यक्षपदासह उरलेल्या १९ प्रभागासाठी मतदान घेण्यात आले. या निवडणुकीतही महायुतीत बिघाडी झाल्याने भाजप, शिवसेना आणि काँग्रेस यापक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. भाजपकडून योगिता चौरे तर शिवसेनेकडून ललिता गायकवाड आणि काँग्रेसकडून प्रतिभा चौरे देशमुख या नगराध्यक्षपदाचे उमेदवार होत्या. निवडणूक निकालात मात्र भाजपाच्या योगिता चौरे यांनी विजय मिळवला आहे. काँग्रेसच्या (पान २ वर)

**शिरपूर वरवाडे नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी चिंतनभाई अमरिशभाई पटेल हे १६ हजार ९५९ मतांनी विजयी झाले. वार्ड १ ते १६ मध्ये भाजपाचे ३१ तर एमआयएम कडून एक उमेदवार विजयी झाला. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार हेमंत पाटील यांचा मात्र पराभव झाला आहे. गेल्या निवडणुकीत शिरपूर येथे १६ वॉर्डमधून ३२ नगरसेवक निवडून आले होते. त्यावेळी काँग्रेसचे २१, भाजपचे ४ आणि अपक्ष ५ नगरसेवक होते.**

# अमेरिका हा सर्वात मोठा धोका; माजी रॉ प्रमुख विक्रम सूद यांचे मोठं वक्तव्य

वृत्तसंस्था । इंदूर



सध्याच्या परिस्थितीत अमेरिका भारतासाठी पाकिस्तानपेक्षा मोठा धोका निर्माण करत आहे. पाकिस्तान भारताला मोठे नुकसान करण्याच्या स्थितीत नाही, परंतु भारताला नुकसान पोहोचवण्याच्या प्रयत्नात ते स्वतःचेच नुकसान करत आहे. भारताला आशियामध्ये महासत्ता बनू देण्याचा अमेरिकेचा हेतू नाही, अशा परखड शब्दांत माजी गुप्तचर विभाग प्रमुख विक्रम सूद यांनी म्हटले आहे.

इंदूरमध्ये आयोजित लिट चौक कार्यक्रमादरम्यान, विक्रम सूद यांनी संवाद साधला. संपादक सुमित अवस्थी यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. जागतिक गतिमानतेवर चर्चा करताना विक्रम सूद म्हणाले की, आजच्या जगात सत्ता आणि नियंत्रण केवळ पैशाभोवती फिरते. अमेरिकेने त्यांची व्यापार धोरणे आणि निर्यात शुल्कांद्वारे जगावर नियंत्रण ठेवले आहे. तथापि, अमेरिकेची पकड आता पूर्वीसारखी मजबूत राहिलेली नाही. म्हणूनच जगातील इतर देश आता नवीन पर्याय शोधत आहेत. लल्लनटॉपचे संपादक सौरभ द्विवेदी यांनीही त्याच कार्यक्रमात (पान २ वर)

# लिंबूवर्गीय फळांसाठी मातीच्या आरोग्यासोबत पाण्याचे व्यवस्थापन सांभाळा : डॉ.हिमांशू पाठक

## ● जैन हिल्स येथे राष्ट्रीय सिट्रस सिम्पोजियम-२०२५ ला सुरवात

प्रतिनिधी । जळगाव

**भारताने शेतीत गेल्या काही दशकांत खूप प्रगती केली आहे. अन्नसुरक्षेतेमध्ये स्वालंबन मिळविले आहे. अन्नधान्यासोबतच फलोत्पादन वाढले आहे, मात्र सर्वात महत्त्वाचे म्हणजे पोषणमूल्ये जोपासली गेली पाहिजे. त्यासाठी मातीचे आरोग्य सांभाळणे, पाण्याचे व्यवस्थापन करणे, खतांचे कार्यक्षमतेने वापर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन दिल्ली येथील नॅशनल अकॅडमी ऑफ ॲग्रीकल्चर सायन्सेसचे अध्यक्ष डॉ.हिमांशू पाठक यांनी केले.**



देशातील लिंबूवर्गीय फळ (संत्री, मोसंबी, लिंबू) उत्पादनाला नवी दिशा देण्यासाठी इंडियन सोसायटी ऑफ सिट्रीकल्चर आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सिट्रस सिम्पोजियम २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नागपूरचे इंडियन सोसायटी ऑफ सिट्रसचे अध्यक्ष डॉ.दिलीप घोष, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे उपाध्यक्ष अनिल जैन, सहव्यवस्थापकिय संचालक अजित जैन, शास्त्रज्ञ डॉ. एन. कृष्णकुमार, गांधी रिसर्च फाऊंडेशचे विश्वस्त डॉ. सुदर्शन अय्यंगार उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.हिमांशू पाठक यांनी, टिश्यूकल्चर, ठिबक, स्प्रिंकलर तंत्रज्ञानाला विज्ञानाचा आधार असून त्याचा वापर वाढला पाहिजे. जल, जमिन, जंगल, जलवायू, जनता यांच्यात शास्त्रोक्त काम करण्यासाठी शेतकरी, शास्त्रज्ञ, उद्योजक, विविध संशोधन संस्था यांच्या सामूहिक प्रयत्नातून पर्यावरणाचा ऱ्हास न होता फलोत्पादनामध्ये मूल्यवर्धनाच्या दृष्टीने शाश्वता आणता येईल, असा विश्वास व्यक्त केला.

अन्नधान्याच्या बाबतीत चांगले काम झाले. आपण आयातदार होतो. आता निर्यातदार, पुरवठादार झालो आहोत. कोविड काळात देशाने जगाला अन्न पुरविले. हे शेतकरी, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या मदतीने शक्य झाले आहे. शेतकरी केंद्रस्थानी ठेवून काम व्हायला हवे. लिंबूवर्गीय पिकांत काम केले जात आहे. पण ढासळलेली उत्पादकता व अन्य समस्यांना दूर करण्यासाठी एकत्रीत प्रयत्न हवे आहेत. शेतकऱ्यांना शाश्वत, पर्यावरणपूरक उपाय, तंत्र पुरविण्याची आवश्यकता आहे. जैन इगिरेशनसारख्या संस्था विज्ञानासोबत तंत्रज्ञानाला धरून पाणी, पर्यावरण यासंबंधी चांगले काम करीत आहेत. पाणी, माती व्यवस्थापनातून बुंदेलखंडमध्ये फळपिके वाढली. केंद्र सरकार त्यासाठी कार्यक्रम, प्रयत्न आणते. नवे शास्त्र, तंत्र हवे आहे, असेही डॉ.पाठक यावेळी म्हणाले.

**संत्र्याला मूल्यवर्धित अन्नापैकी एक मानावे : अनिल जैन**

जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे उपाध्यक्ष अनिल जैन यांनी, शेत, शेतकरी आणि पर्यावरण संवर्धनासोबतच फलोत्पादन कसे वाढविता येईल यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. अंतिम ग्राहकांसाठी 'सुफर फुड' कसे देता येईल यासाठी लायब्ररी, लॅब, लॅण्ड चा सुयोग्य वापर केला पाहिजे, किती उत्पादन झाले यापेक्षा शेतकऱ्याला किती उत्पन्न एकरमागे मिळाले हे महत्त्वाचे आहे. जगातील प्रतिभावन शास्त्रज्ञ हे भारतात आहेत सर्वांगिण दृष्ट्या संशोधनाचा प्रचार प्रसार हा शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे. ज्ञानाचे हस्तांरणार भर दिला. 'चला, फळांचा रस घेऊया आणि आरोग्य सांभाळू या.' असा सल्ला सुद्धा त्यांनी दिला.

**दोन वाणांचे लॉन्चिंग**

जैन इरिगेशन सिस्टीम्सतर्फे लिंबूवर्गीय फळांमध्ये जैन स्वीट ऑरेंज-६ व जैन मॅन्डरीन-१ हे दोन वाण नव्यानेच विकसीत केले आहे. त्यांचे हेमचंद्र पाटील, शिवाजीराव चव्हाण, नवीनकुमार पेठे, अजित जोशी, संतोषकुमार पेठे, के.टी. रेड्डी, एन. श्रीधर, गोणकुंठा लेपाक्षी, व्ही. उमामहेश, बी. व्ही. रेड्डी. या दहा शेतकऱ्यांना ही दोघं वाणांची रोपं देऊन सत्कार करण्यात आला. जैन मॅन्डरीन-१ हे दुसऱ्याच वर्षी उत्पादन देणारं वाण असून ते नागपूर संत्राला उत्कृष्ट पर्याय ठरू शकते असे मत डॉ.मिलींद लधानिया यांनी सांगितले.

# संत शिरोमणी जगनाडे महाराजांच्या जयघोषाने दुमदुमले जळगाव



प्रतिनिधी । जळगाव

**येथील श्री संताजी जगनाडे महाराज तेली समाज बहुउद्देशीय युवक मंडळ जळगावतर्फे रविवार दि.२१ रोजी दुपारी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सवाद्य मिरवणूक पालखी काढण्यात आला. मिरवणुकीत महिला व मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध वेशभूषा साकारल्या.**

सुरुवातीला कांचननगरातील श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ संताजी जगनाडे महाराज आणि संताजी कडोजी महाराज यांच्या प्रतिमेला मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय तुकाराम चौधरी यांच्यासह समाजबांधवांनी पुष्पहार अर्पण केला. यानंतर समाज बांधवांनी संतांच्या जय घोषामध्ये मिरवणुकीला प्रारंभ केला. मिरवणूक ही कांचननगर, चौगुले प्लॉट, भिलपुरा पोलीस चौकी, घाणेकर चौक मार्गे पोलनपेठेतील दत्त मंदिरापर्यंत काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये विविध वेशभूषा करणाऱ्या महिला व मुलींसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यंदाच्या मिरवणूक व पालखी सोहळ्याचे हे पंधरावे वर्ष आहे. यावेळी उपाध्यक्ष सिताराम देवरे, सचिव अनिल पाटील, भगवान फकीरा सोनवणे, सचिन चौधरी, दिलीप चौधरी, भगवान चौधरी, डी. एम. चौधरी, सिंधुताई चौधरी, शोभाताई चौधरी यांच्यासह महिला व पुरुष समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहा.कामगार आयुक्त कार्यालयाचे स्थलांतर

प्रतिनिधी । जळगाव

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन निर्णयानुसार सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाचे नुकतेच गणेश कॉलनीतील युनीटी चेंबर या ठिकाणी नवीन जागेवर स्थलांतरित करण्यात आले आहे.

पहिला मजला, युनिटी चेंबर, खाँजा मिया चौक, गणेश कॉलनी येथे हे कार्यालय स्थलांतर करण्यात आले असून संबंधित सर्व शासकीय कार्यालये, नागरिकांनी यापुढील सर्व पत्रव्यवहार व नवीन पत्त्यावर करावा, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त डॉ. रा.दे. गुल्हाने यांनी प्रसिध्द पत्रकाद्वारे केले आहे.

# संत चोखामेळा वस्तीगृहात संविधान जागर अभियानांतर्गत पार पडला कार्यक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**येथील संबुध्द फाउंडेशनतर्फे संविधान जागर अभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात फाउंडेशनच्या अध्यक्षा सरोजिनी गाजरे-लभाने यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील प्रत्येक शब्दाचा अर्थ दैनंदिन जीवनातील उदाहरणासहित समजावून सांगितला.**



संत चोखामेळा वस्तीगृहातील सुगत तथागत बुद्ध महाविहार येथे सकाळी बुद्ध वंदना ग्रहण करण्यात आली. त्यानंतर लगेचच संबुद्ध फाउंडेशनच्या अध्यक्षा सरोजिनी गाजरे-लभाने यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील प्रत्येक शब्दाचा सोपा अर्थ दैनंदिन जीवनातील उदाहरणासहित उपस्थित उपासक, उपासीका व वस्तीगृहातील सर्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. व्याख्यानानंतर मुलांसोबत संविधानाची सापशिडी हा खेळ खेळण्यात आला. कार्यक्रमासाठी इंजी. निखिल रांजणकर, शिक्षक महेश शिंपी यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी शालीक पानपाटील, संतोष गायकवाड, मायाबाई बाविस्कर वस्तीगृहातील कर्मचारी हे सर्व उपस्थित होते.

# आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत एम.जे. कॉलेज संघ विजयी

प्रतिनिधी । जळगाव

**एम.जे. कॉलेजच्यावतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत जळगाव विभागीय आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट (पुरुष) स्पर्धेत आयोजन दि.१५ ते २० डिसेंबरदरम्यान एकलव्य क्रीडा संकुल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात एम. जे. कॉलेज विरुध्द पी.ओ. नाहाटा कॉलेज यांच्यात होवून एम.जे. कॉलेजने विजय प्राप्त केला.**



स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील नाणेफेक विद्यापरिषद सदस्य डॉ. केतन नारखेडे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी डॉ.अमृता सोनवणे, जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ.चेतन महाजन, पी. ओ. नाहाटा कॉलेजचे क्रीडा संचालक डॉ. आनंद उपाध्याय, ए.सी. एस.कॉलेजचे क्रीडा संचालक डॉ.नवनीत आसी तसेच स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील तृतीय क्रमांकासाठी एस.एस. मणियार विधी महाविद्यालय व जी.एच. रायसोनी कॉलेज यांच्यात लढत झाली. या सामन्यात जी.एच. रायसोनी कॉलेज संघाने विजय मिळवून तृतीय स्थान पटकावले. अंतिम सामना शनिवार, दि.२० रोजी दुपारी १२ वाजता एम.जे. कॉलेज विरुध्द पी.ओ. नाहाटा कॉलेज यांच्यात खेळविण्यात आला. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यामध्ये एम.जे. कॉलेज संघ विजेता ठरला तर पी.ओ. नाहाटा कॉलेज संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेसाठी निवड समिती सदस्य म्हणून ए.सी.एस. कॉलेजचे क्रीडा संचालक डॉ. नवनीत आसी, पी.ओ. नाहाटा कॉलेजचे क्रीडा संचालक डॉ. आनंद उपाध्याय व खाशाबा जाधव महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ.संतोष बडगुजर यांनी काम पाहिले.

## पान १ वरुन

### रेल्वेचा प्रवास महागला......

१ जुलै २०२५ रोजीही तिकिटांच्या दरात वाढ करण्यात आली होती. त्यावेळी मेल आणि एक्सप्रेस रेल्वेगाड्यांचे भाडे प्रति किलोमीटर १ पैसा, तर एसी रेल्वेगाड्यांचे भाडे प्रति किलोमीटर २ पैशांनी वाढवण्यात आले होते. एकूणच, नव्या दरवाढीमुळे रेल्वेचा प्रवास महाग होणार असला, तरी रेल्वेच्या महसुलात मोठी भर पडणार आहे.

### शिंदखेडा राष्ट्रवादी, पिंपळनेर......

प्रतिभा चौरे आणि शिवसेनेच्या ललिता गायकवाड यांना येथील पहिल्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. या निवडणुकीपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रचार सभेसाठी पिंपळनेर येथे आणून शिंदे गटाच्या आमदार मंजुळा गावित यांची आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती.शिंदखेडा तालुक्यातील शिंदखेडा नगर पंचायत निवडणुकीत यंदा चौरंगी लढत रंगतदार ठरली होती. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस असे चारही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक रिंगणात उतरले होते. या ठिकाणी भाजपचे माजी मंत्री जयकुमार रावल यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली खरी, पण भाजपा ऐवजी मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेसला(अजित पवार गट) साथ देत कलावती माळी यांना विजयी केले.भाजपकडून रजनी वानखेडे तर शिवसेनेकडून मनीषा पाटील हे उमेदवार होते आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून कलावती माळी तर काँग्रेसकडून विजया चौधरी हे नगराध्यक्षपदासाठीचे उमेदवार होते. गेल्या निवडणुकीत येथे १७ वार्डात १७ नगरसेवक होते. गेल्यावेळी या ठिकाणी भाजपचे १०, काँग्रेसचे ५ आणि समाजवादी पक्षाचे २ नगरसेवक होते. शिरपूर तालुक्यातील वरवाडे नगर परिषद निवडणुकीत यावेळी माजी मंत्री अमरीश पटेल यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. भाजपकडून त्यांचे पुत्र चिंतन पटेल यांना तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून हेमंत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती.नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी केलेले हेमंत पाटील हे निवडणुकीच्या तोंडावरच शिवसेनेत दाखल झाले होते. यामुळे या निवडणुकीत भाजप विरुद्ध शिंदे गट अशी थेट लढत पाहायला मिळाली. शिंदे गटाच्या प्रचारासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सभा घेण्यात आली होती. या सभेला मंत्री दादा भुसे आणि आमदार मंजुळा गावित उपस्थित होत्या.

### अमेरिका हा सर्वात मोठा......

आपले विचार मांडले. त्यांनी तरुणांना मोबाईल फोनच्या व्यसनापासून सावध केले. द्विवेदी म्हणाले की मोबाईल फोनच्या अतिवापरामुळे तरुणांची प्रतिभा आणि छंद गमावत आहेत. त्यांनी चांगल्या मानसिक आरोग्यासाठी डिजिटल डिटॉक्स किंवा अधूनमधून मोबाईल फोन पूर्णपणे बंद करण्याचा सल्ला दिला.

### जेजुरीत खंडोबाच्या......

नव्या नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी सांगितले. निवडून आलेले नगराध्यक्ष जयदीप बारभाई म्हणाले, गडाच्या पहिल्या पायरीवर घडलेली दुर्घटना अतिशय दुर्दैवी आहे. ज्वालाग्राही आणि भेसळयुक्त भंडाऱ्याचा वापर झाल्यामुळे भडका उडाल्याची स्पष्ट शक्यता आहे. पुढील काळात शहरात विक्री होणाऱ्या अशा भेसळयुक्त भंडाऱ्यावर कडक कारवाई केली जाईल. नगरपालिका यासाठी विशेष पथक उभारणार आहे.

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा......

म्हणाले की, 'राष्ट्रवादी शरद पवार गटात असताना आमदार एकनाथ खडसे, रोहिणी खडसे आमच्या भाजपाच्या स्टेजवर आले आणि प्रचार करायला लागले, हे लोकांना पटणारे नव्हते. एकनाथ खडसे यांचे आता काहीही राहिलेले नाही. दोनदा त्यांची मुलगी विधानसभेत उभी राहिली, मात्र जोरात पडली. मुक्ताईनगरमध्ये आम्हाला भाजपची जागा गमवावी लागली.' भाजपाचे संघटन इथे जिवंत ठेवणे गरजेच : रक्षा खडसे - 'आज मुक्ताई नगरमध्ये नगरपंचायत निवडणुकीत जनतेने शिवसेना शिंदे गटाला कौल दिला आहे. हा कौल मला मान्य आहे. या निवडणुकीची जबाबदारी मी घेतली होती. त्यामुळे नक्कीच पराभवाची जबाबदारीसुद्धा मी घेते. भाजपा म्हणून मला इथे लढणे हे महत्त्वाचे होते. कारण आज मी इथली खासदार आहे, मंत्री आहे. भाजपाचे संघटन इथे जिवंत ठेवणे गरजेचे होते', असे केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले. यावेळी रक्षा खडसे यांनी शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. त्या म्हणाल्या की, 'मधल्या काळामध्ये काही लोकांनी इथे दबावतंत्राचा वापर केलेला होता. त्यामुळे ही निवडणूक त्यांच्या विरोधात होती. मी आधीही सांगितलेले आहे की, ज्या पद्धतीने इथल्या आमदारांचा कारभार, दडपशाही आणि गुंडशाही आहे, आजही त्या मतांवर मी ठाम आहे.'

### निवडणुकीत लोकशाहीचा गळा......

त्यांची वास्तविकता नाही, वास्तव वेगळेच आहे. त्या पुढे म्हणाल्या, अमरावतीमध्ये सहा भाजपाचे उमेदवार निवडून आले आहेत. मात्र, काही नगरपरिषदांमध्ये त्यांचे लोक निवडून आलेले नाहीत. याचा अर्थ असा आहे, ते शासनामध्ये नसल्यास हा आकडा आणखी कमी होईल, हे वास्तव आहे. यशोमती ठाकूर म्हणाल्या, त्यांनी चिखलदऱ्यातही अरेरावी केली. आमच्या लोकांवर त्यांनी दडपण टाकले. अंजनगाव मध्येदेखील त्यांनी तेच केले आहेत. आज सगळीकडे धनशक्तीविरुद्ध जनशक्ती आहे. सगळीकडे तसेच चित्र आहे.

# रोटरी क्लब जळगाव वेस्टतर्फे गड, कोट, किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे गुरुवार, दि.२५ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे गड-कोट-किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रकल्प संकल्पना तुषार तोतला व प्रकल्प प्रमुख राहुल पवार यांनी दिली.**

युनोस्कोद्वारा १२ गड, कोट, किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत नामांकन घोषित झाल्याबद्दल शिवदुर्ग महोत्सव पर्व-१ निमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शालेय समूह व खुला समूह या दोन गटात स्पर्धा होणार आहे. विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रशस्तीपत्र तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात येणार आहे. यानिमित्ताने शनिवार, दि.२७ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता रोटरी भवन येथेच किल्ले रायगडचे जतन-संवर्धन करणारे वास्तु विशारद वरूण भामरे यांचे व्याख्यान व स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

स्पर्धेसाठी कमीत कमी ३ ते जास्तीत जास्त ६ समूह संख्या अपेक्षित आहे. किल्ल्याचा आकार किमान ३ फूट बाय ३ फूट असावा. किल्ला बनविण्यासाठी माती, दगड, वीट यांचा वापर अपेक्षित असून प्लास्टिक, थर्माकोल, प्लास्टर ऑफ पॅरिस या सारख्या पर्यावरणाला हानी पोचविणाऱ्या साहित्याचा वापर करू नये. सहभागी स्पर्धकांना रोटरी वेस्टतर्फे माती, दगड, वीट, तुकडे व पाणी उपलब्ध करून देण्यात येणार असून इतर साहित्य स्पर्धकांनी आणावयाचे आहे. किल्ला हा काल्पनिक नसावा. ऐतिहासिक किल्ल्याची प्रतिकृती असावी असे आयोजकांतर्फे कळविण्यात आले आहे. स्पर्धेसाठी पूर्व नाव नोंदणी आवश्यक असून २० डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत आहे. त्यासाठी योगेश राका, (९८९०८९०८९८) विवेक काबरा, (९८२३०७१५७०) कृष्णकुमार वाणी (९८९०१७७८११) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन अध्यक्ष गौरव सफळे यांनी केले आहे.

# बहिणाबाई विद्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवसनिमित्त पार पडल्या स्पर्धा



प्रतिनिधी । जळगाव

**येथील बहिणाबाई माध्यमिक विद्यालयात शासनाच्या परिपत्रकानुसार अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.**

यात निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यालयातील बऱ्याच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी मुख्याध्यापक विलास नारखेडे यांनी अल्पसंख्यांक हक्क दिनाचे महत्त्व व अल्पसंख्यांक हक्क दिन का साजरा करण्यात येतो? याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला समन्वयिका प्रतिभा खडके यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# गवळण, भजन, सुफी गीतांनी रसिक झाले मंत्रमुग्ध

## ● प्रभाकर कला अकॅडमीतर्फे आयोजन; कथ्थक नृत्याचा घडविला कलाविष्कार

प्रतिनिधी । जळगाव

**येथील प्रभाकर कला संगीत अकॅडमीच्या विद्यार्थिनींनी भारतीय शास्त्रीय कलेतील कथ्थक नृत्याचा कलाविष्कार परंपरा... द कथ्थक लीगसी या कार्यक्रमाच्या माध्यमातून घडविला.**



मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे झालेल्या कार्यक्रमाच्या प्रसंगी जेष्ठ कलावंत व संगीत विषयाचे प्रा.राजेश पुराणिक, संस्थापिका डॉ.अपर्णा भट कासार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राजेश पुराणिक यांनी मार्गदर्शन केले तर वरदा तळेले या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. गणेश व शिव वंदनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. नंतर संत कबीर यांच्या निर्गुण भजनावर आधारित नृत्य सादर करण्यात आले. मन उधान वाऱ्याचे या गीतावर हौशी कलाकारांनी सादरीकरण केले. श्रीकृष्ण आणि राधेच्या विरह भक्तीचा अनुभव देणारे कान्हा तोसे हृदय ना जोडूंगी या आणि बघ उघडूनीया दार या गीतांना रसिकांचा प्रतिसाद लाभला. प्रेम, भक्ती व विरहभाव असलेले अली मोरे अंगणा या सुफी गीतावर विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले. कृष्ण भक्तीचे प्रतीक असलेल्या गवळण प्रकारात काय बाई नवल हे सांगू तुला आणि ठकविल्या गौळणी हरीने या गीतांवर नृत्यविष्कार सादर करण्यात आला. बालगंधर्व चित्रपटातील भक्ती गीतावर आधारित नृत्याने समारोप करण्यात आला. कार्यक्रमात अकॅडमीच्या श्वेता गोसावी, दिश्ना गोसावी, माधुरी भदाणे, अन्वी भदाणे, सुखदा बुवा, आरोही मोरे, वृषाली कोष्टी, अनन्या कोष्टी, दीपिका पाटील, वरदा तळेले, रुद्राक्षी शिंदे, श्रद्धा कोळी, अवंतिका महाजन, अनुभूती महाजन, जीविका पाटील, भार्गवी पाटील, श्रावणी बोरसे, तनुष्का कासार, स्वानंदी मुठे, निष्का मुंदडा, स्वधा भामरे, निधी सुर्वे, एकता जोगी, नित्या वाठ, कल्याणी भामरे, भूमिका बडगुजर, क्षिप्रा महाशब्दे, प्रिशा जोशी, जीवीशा जोशी, स्वरा पाटील, कल्याणी पाटील, ऋत्विका शिरसाळे, स्मरणिका देवळे, अनन्या यादव, युक्ता मोरदे, त्रिवेणी घारगे, समृद्धी पाटील, जुनीशा जेठवानी, संस्कृती गवळे, श्रेया अग्रवाल, स्वानंदी बोरसे, तेजस्विनी क्षीरसागर, मधुरा इंगळे या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# महामार्गावर द बर्निंग टँकरचा थरार

## मासलीपाडा शिवारात चालत्या टँकरने घेतला पेट

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील मासलीपाडा शिवारात आज पहाटे रसायन घेवून जाणाऱ्या टँकर अचानक आग लागली. त्यानंतर डिझेलच्या टाकीचा स्फोट झाल्याने टँकर भस्मसात झाला. चालक व सहचालकाने प्रसंगावधान राखून टँकर रस्त्याच्या कडेला थांबवल्याने जिवीतहानी टळली.**



धुळे-सुरत महामार्गावरील राष्ट्रीय मासलीपाडा शिवारात आज शनिवारी पहाटे सुमारे पाच वाजेच्या सुमारास प्लायस रसायन वाहून नेणाऱ्या टँकरला अचानक भीषण आग लागल्याची खळबळजनक घटना घडली. भुसावळहून सुरतकडे जाणारा टँकर (क्रमांक एनएल ०१ जे२०८०) पेट घेताच काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. प्राथमिक माहितीनुसार टँकरच्या वायरिंगमध्ये झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आगीची तीव्रता वाढल्यानंतर टँकरच्या डिझेल टाकीचा मोठा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका प्रचंड होता की संपूर्ण परिसर हादरून गेला. महामार्गावर एकच भीतीचे वातावरण निर्माण झाले. या आगीत टँकर पूर्णतः जळून खाक झाला.

चालक वृंदावनसिंग आणि सहचालक नरसिंग कुशवा यांनी प्रसंगावधान राखत वेळीच टँकर रस्त्याच्या कडेला थांबवून बाहेर उडी घेतल्याने त्यांचे प्राण वाचले. या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच विसरवाडी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या मदतीने वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. सुदैवाने या भीषण घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठा अनर्थ टळला आहे.

## नवापुरात बिबट्याचा मुक्तसंचाराने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर शहरातील गणेश हिल परिसरात बिबट्याचे दर्शन झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, अवघ्या दोन महिन्यांपूर्वी याच परिसरात बिबट्या दिसल्याने खळबळ उडाली होती. आता पुन्हा बिबट्या परतल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे सावट आहे. रात्रीचा संचार टाळण्याचे आवाहन गणेश हिल आणि लगतच्या परिसरातील रहिवाशांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात येत आहे.**

बिबट्या रात्रीच्या अंधारात अधिक सक्रीय असल्याने लहान मुले आणि वृद्ध नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. परिसरातील पथदिवे सुरू ठेवण्यासोबतच, घराबाहेर पडताना हातात बॅटरी किंवा काठी ठेवण्याच्या सूचनाही नागरिक एकमेकांना देत आहेत. वन विभागाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष दोन महिन्यांपूर्वी बिबट्या दिसल्यानंतर वन विभागाने गस्त वाढवली होती. मात्र, बिबट्याचा कायमचा बंदोबस्त होऊ शकला नाही. आता पुन्हा बिबट्या दिसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, वन विभाग बिबट्याला जेरबंद करणार की फक्त पाहणी करणार? असा सवाल विचारला जात आहे. शहरातील गजबजलेल्या भागात बिबट्या येणे हे धोक्याचे लक्षण आहे. वन विभागाने तातडीने पिंजरा लावून या बिबट्याचा बंदोबस्त करावा, जेणेकरून आम्हाला मोकळा श्वास घेता येईल. स्थानिक रहिवांशी परिस्थिती गणेश हिल परिसरात सायंकाळनंतर शुकशुकाट पाहायला मिळतोय. वन विभागाने तातडीने शोध मोहीम राबवून पिंजरा लावावा अशी मागणी होत आहे.

## थोडक्यात

### हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत बैठक

**धुळे** । प्रतिनिधी आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता काँग्रेस भवन, धुळे येथे येणार आहेत. यावेळी काँग्रेस भवन येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या दौऱ्यात धुळे शहर व जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती, महापालिका निवडणूक रणनीती, संघटन बळकटीकरण, तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सविस्तर संवाद साधण्यात येणार आहे.

### अल्पसंख्याक हक्क दिन

**बोराडी** । किसान विद्या प्रसारक संस्था संचलित मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू माध्यमिक विद्यालय व कलिमोद्दीन मोहियोद्दीन जागीदार ज्युनिअर कॉलेज येथे अल्पसंख्यांक हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य शेख फारुख इस्माईल हे होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ शिक्षक आबीद मनियार यांनी अल्पसंख्यांकांच्या हक्कांबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी राज्यघटनेत अल्पसंख्यांक समुदायांसाठी घटनात्मक तरतुदींविषयी माहिती दिली. भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा महत्व व हक्क याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी पर्यवेक्षक जाकीर खाटीक, ज्येष्ठ शिक्षक लईक शेख, इरफान शेख, हाजी वसीम बागवान, अबरार काजी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुन्ना यांनी केले, तर कार्यक्रमाचा आभार प्रदर्शन जावीद शेख यांनी केले.

### समस्त विश्वकर्मीय समाजातर्फे शोकसभा

**धुळे** । शिल्पकलेचे भिष्म पितामह, पद्मविभूषण व महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित स्व. राम वनजी सुतार (वय १०१) यांचे दि. १८ डिसेंबर रोजी नोएडा येथे निधन झाले. स्व. राम सुतार यांनी आपल्या शिल्पकलेद्वारे भारताचा इतिहास, संस्कृती व थोर व्यक्तिमत्त्वे दगड व धातूत अजरामर केली. त्यांच्या निधनाने महान शिल्पकार गमावला आहे. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी समस्त विश्वकर्मीय समाज, धुळे जिल्हा यांच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही शोकसभा रविवार, दि. २१ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत दाते रेसिडेन्सी, निसर्गोपचार केंद्राशेजारी, मालेगाव रोड, धुळे येथे होणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्व. राम सुतार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## हिंदी परीक्षेत समता महाजन राज्यात प्रथम

प्रतिनिधी । नंदुरबार

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या हिंदी परीक्षेत येथील श्रीमती हि. गो. श्रॉफ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी समता गोपाळ महाजन हिने राज्यात प्रथम आली. तर प्रणव देवीदास महाजन, मानसी एकनाथ चित्ते यांनी जिल्हयात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणेद्वारा शालेय हिंदी प्रचार व प्रसार परीक्षा सप्टेंबर २०२५ मध्ये आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेत इयत्ता सातवीची विद्यार्थिनी समता गोपाळ महाजन ही राज्यात पहिली आली असून, प्रणव देविदास महाजन, मानसी एकनाथ चित्ते यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. नितल कमलेश कोळी, देवयानी देवेंद्र मोरे, कल्पेश प्रकाश सोनवणे, सोनाक्षी जितेंद्र चव्हाण यांनी शाळेत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. तनिष्का हेमराज अघाव, ओम महेंद्र चौधरी, तेजस अमर बांगर, पियुष शिवाजी तवर, तन्मय सुनील बागुल यांनी शाळेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे व इतर सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. तसेच समता महाजनला मार्गदर्शन करणारे सुनील राणा यांना देखील विद्यापीठातर्फे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या परीक्षेस यशस्वी होण्याकरिता राहुल वडनेरे, देविदास पाटील, शीला पाटील, मीना नंदवाळकर, गीता महाजन, चंद्रेश राणा, जगदीश वंजारी यांनी परिश्रम घेतले

## धुळ्यात संत गाडगे महाराजांना अभिवादन

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील देवपूर येथील श्री संत गाडगेबाबा महाराज सांस्कृतिक मंडळातर्फे थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त एकवीरा देवी मंदिराजवळील मठात अभिवादन करण्यात आले.**



या कार्यक्रमाला माजी स्थायी समिती सभापती कैलास चौधरी, माजी नगरसेवक सुनील महाले यांच्यासह मान्यवरांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत गाडगे महाराजांच्या स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. या प्रसंगी शंकर पाराटे, दिलीप आखाडे, प्रकाश शिरसाट, मधुकर पाराटे, वाल्मीक वाघ, अध्यक्ष अमोल गायकवाड, उपाध्यक्ष प्रवीण शिंदे, खजिनदार संजय गवळी, सचिव शंकर सगरे, सहसचिव कपिल पाराटे, सहखजिनदार महेंद्र सगरे, सदस्य राजेंद्र गवळी, दिलीप गवळी, कृष्णा शिंदे, शेखर वाघ, संजय निकम, पारस निकम, गणेश सगरे, जगदीश सगरे, भिका निकम, विलास पाराटे, दिलीप हजारे, राहुल सगरे, श्रवण शिरसाट, मनोज वाघ, मनोज मस्के, दिनेश सगरे, प्रशांत सोनवणे, सुनील आगजाळे, अनिल राऊत, पवन गायकवाड, अशोक निकम, महिला मंडळाचे अध्यक्ष रेखा गवळी, उपाध्यक्ष कल्पना निकम, खजिनदार मनीषा सगरे, सहसचिव गायत्री सगरे, सहखजिनदार धनश्री पाराटे, सदस्य सविता आगजाडे, संगीता गवळी, प्रियांका वाघ, सुप्रिया गायकवाड, रोहिणी सगरे, चबीताई निंबा खैरनार, शंकर पाराटे, दिलीप आघाडे, प्रकाश शिरसाठ, वाल्मीक आगजाळे, यांच्यासह आदी समाजबांधव उपस्थित होते.

## दोन रूग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत : आ. राम भदाणे

प्रतिनिधी । धुळे

धुळे तालुक्यातील देऊर बु. व बाळापूर येथील अनुक्रमे रियांश किरण पगारे व कविता वाघ यांच्या नवजात बालकावरील उपचारासाठी अनुक्रमे दोन लाख व पन्नास हजार रूपये मुख्यमंत्री सहायता निधीतून अर्थसहाय्य मंजूर झाले आहेत. आमदार राम भदाणे यांच्या पाठपुराव्यातून हा निधी मंजूर झाला दोन्ही रूग्णांच्या नातेवाईकांकडे जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांच्या हस्ते अर्थसहाय्य मंजुरीचे पत्र देण्यात आले. देऊर बु. येथील रियांश किरण पगाये यांच्यावरील बोन मॅरो ट्रॉन्सप्लॉसाठी आर्थिक निकड होती. शस्त्रक्रिया व आजारावरील उपचाराचा खर्च भागविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून दोन लाखाचे अर्थसहाय्य मंजूर झाले आहे. तर बाळापूर येथील कविता वाघ यांच्या नवजात बालकावरील शस्तक्रियेसाठी पन्नास हजाराचे अर्थसहाय्य मंजूर झाले आहे.

## ऊर्जा मंत्रालयाच्या सचिवांनी प्रयोगशील शेतकऱ्यांशी साधला संवाद

प्रतिनिधी । नंदुरबार

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठातर्फे जरी यांना याबाबत अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले.**

तालुक्यातील कोळदा येथील डॉ. हेडगेवार सेवा समिती संचलीत कृषि विज्ञान केंद्राला उर्जा मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव पियुष सिंह यांनी भेट दिली. यावेळी नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, नियोजन अधिकारी शशांक काळे, डॉ. हेडगेवार सेवा समितीचे कोषाध्यक्ष कृष्णा गांधी, आत्माचे प्रकल्प संचालक दिपक पटेल, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ राजेंद्र दहातोंडे आणि सर्व शास्त्रज्ञ यांची उपस्थिती होती.

या भेटीदरम्यान कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबारच्या प्रक्षेत्रावरील परसबाग, बोअरवेल पुनर्भरण, पपई ला गवड तंत्रज्ञान, कापूस पिकातील नवनवीन तंत्रज्ञान, नैसर्गिक शेतीचे प्रात्यक्षिके, कांदा बीज उत्पादन यांना भेटी दिल्या. यावेळी कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार येथे सिलेज प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम मधील भेटीत एकात्मिक शेती पद्धती, भूमिसुपोषण, बियाणे संवर्धन, रेशीम शेती, मधुमक्षिका पालन, सुधारित अवजारे, जैविक कीड नियंत्रणाच्या पद्धती यातील विविध तंत्रज्ञानाची माहिती घेतली. यावेळी कृषी विज्ञान केंद्र नंदुरबार येथील सर्व शास्त्रज्ञांनी तपशीलवार माहिती दिली. माती आणि पाणी परीक्षण प्रयोगशाळा भेट दिली. वुमन्स टेक्नॉलॉजी पार्कमध्ये ग्रामीण स्तरावर करता येण्याजोग्या विविध उद्योग व्यवसायांची माहिती त्यांनी घेतली आणि उद्योगाला चालना देण्याचे आवाहन केले. कृषि विज्ञान केंद्र मार्फत चालू असलेल्या विविध प्रयोगाची दखल घेत ट्रॅक्टर, बैलचलित आणि मनुष्यचलित अवजारांबद्दलही माहिती जाणून घेतली. यावेळी शेतकरी संवादाचे आयोजन करण्यात आले होते. शेतकरी संवाद कार्यक्रमात पियुष सिंग यांनी पोषक तृणधान्याचे महत्व सांगून तृणधान्याच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी प्रशिक्षणाचा चांगला उपयोग करून बचत गटाच्या माध्यमातून तृणधान्याच्या बेकरी पदार्थांचि निर्मिती आणि विक्री व्यवस्थापन करावे असे आवाहन केले. या शेतकरी संवादात कांतीलाल नाईक बोरचेक यांनी नेसू नदीवरील पाण्याचे प्रयोग आणि नेसू नदी पूजन याविषयी माहिती दिली. सोनपाडा येथील मानसिंग वळवी यांनी दाल मिल संबंधीचे अनुभव व्यक्त केले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट रीसर्च, हैदराबाद येथे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

## चाळीसगावात नगराध्यक्षपदी भाजपाच्या प्रतिभा चव्हाण विजयी

प्रतिनिधी । चाळीसगाव

पालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदावर आमदार मंगेश चव्हाण यांच्या सौभाग्यवती प्रतिभा चव्हाण यांनी विजय मिळवल्यानंतर भाजपा समर्थकांनी जोरदार जल्लोष केला. या निवडणुकीत आमदार चव्हाण यांची मतदारसंघावरील आपली पकड घट्ट असल्याचे स्पष्ट झाले आहे. चाळीसगाव चाळीसगाव विधानसभा मतदारसंघात यंदा मोठी चुरस होती. चाळीसगावचे माजी आमदार राजीवदादा देशमुख यांचे अकस्मात निधन झाल्याने राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असतांनाच नगरपालिका निवडणुकीची घोषणा झाली होती.



**भाजपा उमेदवार विजयी**

पालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने आमदार मंगेश चव्हाण यांच्या सौभाग्यवती प्रतिभा चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली तर महाविकास आघाडीच्या वतीने शहरविकास आघाडीच्या माध्यमातून माजी नगराध्यक्षा पद्मजा राजीव देशमुख यांना उमेदवारीच्या रिंगणात उतरवण्यात आले. याआधी २०१९ साली मंगेश चव्हाण आणि राजीव देशमुख यांच्यात आमदारकीची लढत झाली होती. यानंतर सहा वर्षांनी दोघांच्या सौभाग्यवती लोकनियुक्त नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत एकमेकांच्या समोर उभ्या ठाकल्या. अर्थात, पुन्हा एकदा चाळीसगावात चव्हाण विरूध्द देशमुख असा सामना रंगल्याने येथील निवडणूक ही लक्षवेधी ठरली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या प्रचाराची धुरा आमदार मंगेश चव्हाण यांनी सांभाळली तर शहर विकास आघाडीची सूत्रे माजी आमदार तथा खासदार उन्मेष पाटील यांच्याकडे होती.

**आमदारांनी पाचोऱ्यात ठोकले षड्डू**

निवडणुकीची लक्षणीय बाब म्हणजे आमदार मंगेश चव्हाण यांनी पाचोरा येथे जाऊन आमदार किशोरआप्पा पाटील तर पारोळ्यात माजी आमदार सतीशअण्णा पाटील यांना आव्हान दिले त्यामुळे या दोन्ही मान्यवरांनी आपापल्या पक्षांची भूमिका सोडून पद्मजाताई देशमुख यांच्या प्रचारासाठी चाळीसगावात सभा घेतल्या. याला भाजपतर्फे प्रत्युत्तर देण्यात आले. अर्थात, दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात आरोप-प्रत्यारोप करण्यात आल्याने निवडणुकीच्या काळात येथील वातावरण मोठ्या प्रमाणात तापल्याचे दिसून आले. रविवारी मतमोजणी सुरू झाल्यानंतर प्रतिभा चव्हाण यांनी आघाडी घेतली व लीड त्यांनी कायम राखत विजयाला गवसणी घातली. आमदार चव्हाण यांचा करीष्मा चाळीसगावात पुन्हा दिसून आला आहे.

## भुसावळात संजय सावकारेंना धक्का : राष्ट्रवादीच्या उमेदवार गायत्री भंगाळे नगराध्यक्षपदी विजयी

प्रतिनिधी । भुसावळ

**भुसावळ पालिकेच्या अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीचा रविवारी सकाळी १० वाजेपासून निकाल जाहीर होण्यास सुरूवात झाली आहे.**

नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार गायत्री चेतन भंगाळे विजयी झाल्या असून त्यांना ४२ हजार २३४ मते मिळाली आहेत तर प्रतिस्पर्धी भाजपाच्या उमेदवार रजनी संजय सावकारे यांना ४० हजार ३८७ मते मिळाली. एक हजार ८४७ मतांनी गायत्री भंगाळे-गौर विजयी झाल्या आहेत. विजयानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष केला.

**नगराध्यक्ष पदाच्या पराभूत उमेदवारांना अशी मिळाली मते**



राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या अर्शिया अन्सारी (८२५१), काँग्रेसच्या सविता प्रवीण सुरवाडे (४०७१), बसपाच्या किर्ती सुरेश वानखेडे (१०९६) मते मिळवून पराभूत झाल्या. ११४६ मतदारांनी नोटाचा पर्याय स्वीकारला. प्रभाग क्रमांक एक अ मधून पूजा प्रेमचंद तायडे (१३४९) विजयी झाल्या असून प्रतिस्पर्धी शिवसेना शिंदे गटाच्या ज्योती लक्ष्मण सोयंके (५६५), अपक्ष सीमा रुपेश धांडे (११८०) पराभूत झाल्या तर ८२ मतदारांना नोटाचा पर्याय स्वीकारला.

## पाचोऱ्यात शिंदे गटाला एकहाती सत्ता : आमदार किशोर पाटील किंगमेकर

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने एकहाती सत्ता मिळवली आहे. येथे भाजपाचे गिरीश महाजन, आमदार मंगेश चव्हाण यांचा प्रभाव चालला नसल्याचे दिसून आले आहे. मतमोजणी पूर्ण होताच बहुतांश प्रभागांमध्ये शिंदेगटाच्या उमेदवारांनी दणदणीत विजय मिळवत नगरपालिकेवर आपली मजबूत पकड निर्माण केली आहे.**

प्रभाग क्रमांक १ मध्ये अ आणि ब या दोन्ही जागांवर शिवसेना शिंदे गटाने विजय मिळवला आहे. प्रभाग १ अ मधून मनिषा सुरेंद्र बाविस्कर यांनी तर प्रभाग १ ब मधून किशोर गुणवंत बारावकर यांनी विजय संपादन करत शिंदे गटाची विजयी सुरुवात केली. या प्रभागात मतदारांनी स्पष्टपणे सत्ताधारी गटावर विश्वास दाखवला.

प्रभाग क्रमांक २ मध्येही शिवसेना शिंदे गटाचा प्रभाव कायम राहिला असून, २ अ मधून संजय नाथालाल गोहिल आणि २ ब मधून वैशाली छोटुलाल चौधरी यांनी विजय मिळवला आहे. या प्रभागात विकासकामे आणि स्थिर नेतृत्व हे निर्णायक मुद्दे ठरल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

प्रभाग क्रमांक ३ अ गटातून भारतीय जनता पक्षाच्या कविता विनोद पाटील यांनी विजय मिळवत भाजपचे खाते उघडले, तर ब गटातून शिवसेना शिंदेगटचे सतीश पुंडलिक चेडे यांनी बाजी मारली. या प्रभागात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली.

प्रभाग क्रमांक ४ मध्ये शिवसेना शिंदेगटने पुन्हा आपली ताकद सिद्ध केली असून, ४-अ मधून रफिक गफ्फार बागवान आणि ४-ब मधून शेख रशीदाबी शब्बीर यांनी विजय मिळवला आहे. या प्रभागातील निकालाने शिंदेगटची पकड अधिक मजबूत झाली आहे.

प्रभाग क्रमांक ५ मध्येही शिवसेना शिंदेगटचा झेंडा फडकला असून, ५-अ मधून खनसा सलीम बागवान आणि ५-ब मधून संजय त्र्यंबक चौधरी यांनी विजयी होत मतदारांचा विश्वास संपादन केला आहे. अल्पसंख्याक आणि सर्वसामान्य मतदारांचा पाठिंबा या विजयात महत्त्वाचा ठरला.

प्रभाग क्रमांक ६ मध्ये अ आणि ब दोन्ही जागांवर शिवसेना शिंदेगटचे उमेदवार विजयी झाले आहेत. ६-अ मधून रहेमान बिस्मिल्ला तडवी आणि ६-ब मधून प्रांजल सुमित सावंत यांनी स्पष्ट मताधिक्याने विजय मिळवला असून, या प्रभागातही शिंदेगटचा दबदबा कायम राहिला आहे. या निकालांमुळे पाचोरा नगरपालिकेवर शिवसेना शिंदे गटाचे संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले असून, आगामी काळात नगरपालिकेच्या कारभारात सत्ताधारी गटाला निर्णय घेणे अधिक सोपे जाणार आहे. मतदारांनी दिलेला कौल हा विकासाभिमुख प्रशासन आणि स्थिर नेतृत्वाच्या अपेक्षांचे प्रतीक मानला जात आहे. एकंदरीत, पाचोरा नगरपालिका निवडणूक २०२५ मध्ये शिवसेना शिंदे गटाने बहुसंख्य प्रभागांवर विजय मिळवत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे.

## नंदुरबार खोखो असो.चा संघ बीड येथे रवाना

प्रतिनिधी । नंदुरबार

बीड येथे होणाऱ्या ६१ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी नंदुरबार जिल्ह्याचा संघ सहभागी होणार आहे व सदर संघास नंदुरबार जिल्हा खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. संजय जाधव, महाराष्ट्र राज्य खो खो असोसिएशनचे सहसचिव डॉ. प्रा. राजेश सोनवणे यांनी दोघी संघांना शुभेच्छा दिल्या. पुरुष व महिला संघाचा चार दिवसीय सराव शिबीर शहादा येथील वसंतराव नाईक कॉलेजच्या मैदानावर राबवण्यात आला.

# चोपड्यात शिवसेनेची एकहाती सत्ता

## नगराध्यक्षपदी नम्रता पाटील ५ हजार ४५३ मतांनी विजयी

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने स्पष्ट बहुमत मिळवत शहराच्या राजकारणावर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. नगराध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार नम्रता सचिन पाटील यांनी भाजपाच्या साधना नितीन चौधरी यांचा ५ हजार ४५३ मतांनी पराभव केला. नम्रता पाटील यांना २३ हजार १४२ मते मिळाली, तर साधना चौधरी यांना १७ हजार ६८९ मते मिळाली.**



या विजयामुळे शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह संचारला असून शहरात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. या निवडणुकीत विकासकामांचा मुद्दा मतदारांवर प्रभाव टाकणारा ठरल्याचे चित्र आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार लताताई सोनवणे यांनी चोपडा शहरात रस्ते, गटारी, पाणीपुरवठा सुधारणा, नवीन जलवाहिनीसाठी अमृत योजना तसेच शिवशाही घरकुल योजनेसाठी कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर करून आणली. या विकासकामांमुळे शहराचा चेहरामोहरा बदलत असल्याचा विश्वास मतदारांमध्ये निर्माण झाला आहे. त्याचाच फायदा शिवसेना शिंदे गटाला झाल्याचे राजकीय विश्लेषक सांगतात.

प्रभाग क्र १ जागा क्र.अ मधून हितेंद्र रमेश देशमुख (सुराज्य परिवर्तन आघाडी) २ हजार ६१५ मतांनी विजयी झाले. प्रभाग क्र १ जागा क्र. ब मधून माधुरी रामचंद्र देशमुख (सुराज्य परिवर्तन आघाडीतून) २ हजार ४९२ मतांनी विजयी झाले. प्रभाग क्र .२ जागा क्र . अ मधून देवयानी पवन माळी (शिवसेना शिंदे) गटातून १ हजार ४०० मते मिळवून विजयी झाल्या. प्रभाग क्र .२ ब - शरद बाबूराव पाटील (९५६-भाजपा), प्रभाग ३ अ - वंदना सुधाकर बाविस्कर १०३५ मते मिळवून विजयी (काँग्रेस), प्रभाग ३ ब - ईश्वर युवराज अलकरी (१०५०-अपक्ष), प्रभाग ४ अ - रमेश ग्यानोबा शिंदे (१२६३-शिवसेना), प्रभाग ४ ब - सै.शिरीन बेगम उस्मान अली (१४८७-शिवसेना), प्रभाग ५ अ - रुकसारबी अब्दुल बागवान (१५५८-शिवसेना), प्रभाग ५ ब- योगेंद्र राजेंद्र चव्हाण (१५२४-शिवसेना), प्रभाग ६ अ- दिपाली विनोद चव्हाण (१७४९-शिवसेना), प्रभाग ६ ब- जयस्वाल गजेंद्र अरविंद (१९३९-भाजप), प्रभाग ७ अ- शकिलाबी इसाक बागवान (१८६८-राष्ट्रवादी काँग्रेस), प्रभाग ७ ब - भुपेंद्र नटवरलाल गुजराथी (१५९९-राष्ट्रवादी काँग्रेस), प्रभाग ८ अ- रोहन महेंद्र पाटील (१७०४-भाजप), प्रभाग ८ ब- निशा अनुप जैन (१५२९-शिवसेना), प्रभाग ९ अ- शालिनी रुपचंद पाटील ( १७४७-शिवसेना), प्रभाग ९ ब- नरेंद्र साहेबराव पाटील ( १७४३-भाजप), प्रभाग १० अ - भारती सुनिल चौधरी (१४८५-शिवसेना), प्रभाग १० ब- अमोल साहेबराव पाटील (१५७०-कॉंग्रेस), प्रभाग ११ अ- नशिबबानो जहिरुद्दीन जहांगिरदार (१५०३-शिवसेना), प्रभाग ११ ब-हुसेन खा अय्युबखा पठाण (११३३ - शिवसेना), प्रभाग १२ अ - प्रविण सदाशिव देशमुख (१९०५-शिवसेना), प्रभाग १२ ब - पुजा रणजीत देशमुख (१९८१ - भाजप), प्रभाग १३ अ - संध्या नरेश महाजन (१६५५-भाजप), प्रभाग १३ ब - किशोर रामदास चौधरी (१५३८-शिवसेना), प्रभाग १४ अ - रमाकांत नथ्थू ठाकूर (५०१-काँग्रेस), प्रभाग १४ ब- राजनंदीनी राजेंद्र पाटील (८९५-शिवसेना), प्रभाग १५ अ - वैशाली गोपाळ पवार (२४९५-शिवसेना), प्रभाग ब - पंकज सुरेश बोरोलो (२५२३-शिवसेना), प्रभाग १५ क - वंदना दिलीप पाटील ( १९९३-काँग्रेस)

**• मतदारांचे विकासाला प्राधान्य**

**नगरपरिषदेच्या प्रभागनिहाय निकालातही भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच अपक्ष उमेदवारांनाही काही प्रभागांत यश मिळाले आहे. प्रभाग क्रमांक १ मधून सुराज्य परिवर्तन आघाडीचे उमेदवार विजयी झाले, तर काही प्रभागांत भाजप व काँग्रेसने आपली उपस्थिती दाखवून दिली. मात्र एकूणच सदस्य संख्येच्या दृष्टीने शिवसेना शिंदे गट मजबूत स्थितीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या निकालामुळे चोपडा नगरपरिषदेत शिवसेना शिंदे गटाचे नेतृत्व अधिक बळकट झाले असून आगामी काळात शहरातील विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चोपड्यातील मतदारांनी विकासाच्या मुद्द्याला प्राधान्य देत शिवसेना शिंदे गटाकडे पुन्हा एकदा शहराची सूत्रे सोपवली असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.**

# अमळनेर नगरपरिषदेत नगराध्यक्षपदी डॉ. परिक्षीत बाविस्कर यांचा विजय

## १२ अपक्ष; ११ शहर विकास आघाडीला, १० चौधरी पुरस्कृत

प्रतिनिधी । अमळनेर

**अमळनेर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये मतदारांनी स्पष्ट कौल देत डॉ. परिक्षीत श्रीराम बाविस्कर यांना नगराध्यक्षपदी निवडून दिले आहे. डॉ. बाविस्कर यांनी तब्बल ३०,८५६ मते मिळवत प्रतिस्पर्ध्यावर ८,६४८ मतांची भक्कम आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला. या निकालामुळे अमळनेरच्या स्थानिक राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे चित्र आहे.**

नगरपरिषदेत पक्षीय बलाबल (एकूण ३६ जागा)- शहर विकास आघाडी - ११, शिवसेना (धनुष्यबाण) - शिरीष चौधरी - १०, शिरीष चौधरी पुरस्कृत उमेदवार - ०२, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट - तुतारी) - ०१, अपक्ष - १२, अपक्ष उमेदवारांची संख्या लक्षणीय असल्याने आगामी काळात नगरपरिषदेत त्यांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. प्रभाग क्र. ८ अ मध्ये सचिन बळवंत पाटील हे बिनविरोध निवडून आले, तर प्रभाग क्र. ११ ब मध्ये विजय कहारू पाटील यांनी सर्वाधिक २,१७६ मते मिळवत लक्षवेधी विजय मिळवला. प्रभागनिहाय विजयी उमेदवार - प्रभाग क्र. १ अ - कविता विजय राजपूत, (शहर विकास आघाडी) - १३५० मते, प्रभाग क्र. १ ब - कैलास नामदेव पाटील, (अपक्ष) - १३४६ मते, प्रभाग क्र. २ अ - कांबळे देवेंद्र भानुदास (शहर विकास आघाडी) - १४८८ मते, प्रभाग क्र. २ ब - अफसाना मुक्तार खाटीक (शहर विकास आघाडी) - १६२३ मते, प्रभाग क्र. ३ अ - शोभाबाई भिवसन गढरे (शहर विकास आघाडी) - १४१३ मते, प्रभाग क्र. ३ ब - भरतकुमार सुरेश ललवाणी (शहर विकास आघाडी) - १२८० मते, प्रभाग क्र. ४ अ - नंदा नरेंद्र संदानशिव (शहर विकास आघाडी) - १९०० मते (विजयी), प्रभाग क्र. ४ ब - शेख नाविद अहमद मुशिरोद्दीन (शिवसेना) - १४९१ मते, प्रभाग क्र. ५ अ - श्रीराम भगवान चौधरी (शिवसेना) - १४५४ मते (विजयी), प्रभाग क्र. ५ ब - कल्पना भरतसिंग परदेशी (सफरचंद) - १३९२ मते (विजयी), प्रभाग क्र. ६ अ - सविता योगराज संदानशिव (कपबशी) - २०७४ मते (विजयी), प्रभाग क्र. ६ ब - दीपक हरी चौगुले (कपबशी) - १९२६ मते, प्रभाग क्र. ७ अ - प्रा. योगिता सयाजीराव कापडणेकर (अपक्ष) - १२४१ मते (विजयी), प्रभाग क्र. ७ ब - प्रवीण गंगाराम पाटील उर्फ राजू फाफोरेकर - १३३२ मते (विजयी), प्रभाग क्र. ८ अ - सचिन बळवंत पाटील (बिनविरोध), प्रभाग क्र. ८ ब - अपूर्वा जालंधर चौधरी (पाटील) - १४५३ मते (विजयी), प्रभाग क्र. ९ अ - शर्मा कल्पना चंद्रकांत - १३३१ मते (विजयी), प्रभाग क्र. ९ ब - चौधरी पंकज पंडित - १५३७ मते (विजयी), प्रभाग क्र. १० अ - संजय विभाकर कासार (गोपी कासार) (अपक्ष) (विजयी) प्रभाग क्र. १० ब - स्वाती परदेशी (अपक्ष) - ११८२ मते (विजयी), प्रभाग क्र. ११ अ - छाया बाळू पाटील - १६३७ मते (विजयी), प्रभाग क्र. ११ ब - विजय कहारू पाटील (अपक्ष) - २१७६ मते (विजयी), प्रभाग क्र. १२ अ - पुष्पा पंकज भोई - १५८६ मते (विजयी), प्रभाग क्र. १२ ब - धनगर सुयोग ज्ञानेश्वर (शिंदे सेना) - १६१८ मते (विजयी), प्रभाग क्र. १३ अ - जुबेदाबी नशिरोद्दिन काझी - १८९८ मते (विजयी), प्रभाग क्र. १३ ब - अनिल गंगाराम महाजन (अबू महाजन) - १६६६ मते, प्रभाग क्र. १४ अ - सुवर्णा तुळशीराम हाटकर (अपक्ष) - १२८५ मते (विजयी), प्रभाग क्र. १४ ब - रामकृष्ण बाबुराव पाटील (अपक्ष) - ९२३ मते (विजयी), प्रभाग क्र. १५ अ - प्रशांत मनोहर निकम - ११४० मते (विजयी), प्रभाग क्र. १५ ब - पाटील जयश्री अनिल (विजयी), प्रभाग क्र. १६ अ - देशमुख महेश प्रभाकर (महेश बापू) (अपक्ष) (विजयी), प्रभाग क्र. १६ ब - नीलिमा विश्वनाथ (रवी पाटील(अपक्ष) (विजयी), प्रभाग क्र. १७ अ - पाटील स्वप्ना विक्रांत (शिटी) (विजयी), प्रभाग क्र. १७ ब - पवार साहेबराव वसंत (दादा पवार), प्रभाग क्र. १८ अ - रूपाली विलास शिवदे (अपक्ष) - १९६५ मते (विजयी), प्रभाग क्र. १८ ब - इर्शाद सुनिल तडवी - १३५७ मते (विजयी).

# रावेर नगरपालिका नगराध्यक्षपदी भाजपच्या संगीता महाजन विजयी

## राष्ट्रवादी काँग्रेसला सर्वाधिक १० जागा; उबाठा पक्षाचे मनिषा पवार यांचा दारुण पराभव

प्रतिनिधी । रावेर

**येथील नगरपालिकेच्या अतिशय अटीतटीच्या व चूरशीच्या झालेल्या निवडणुकीची मतमोजणी आज करण्यात आली. नगराध्यक्ष पदाचे शिवसेना ( उबाठा)पक्षाचे प्रतिस्पर्धी उमेदवार मनीषा रवींद्र पवार यांचा पराभव करीत रावेर नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी भाजपच्या संगीता भास्कर महाजन या विजयी झाल्या आहेत. तर नगरसेवक पदाच्या निवडणुकीत माजी नगराध्यक्ष रिया शीतल पाटील यांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे.**



भाजपची प्रभाग २ मधील एक जागा यापूर्वीच बिनविरोध झाली होती. पक्ष चिन्हावर लढलेल्या भाजपला ९ जागा मिळाल्या असून राष्ट्रवादी अजित पवार गटाला १०, काँग्रेसला २ तर राष्ट्रवादी शरद पवार गटाला १ जागा मिळाल्या आहेत. २ जागांवर अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत. संगीता महाजन यांच्या विजयामुळे रावेर नगरपालिकेवर भाजपने झेंडा रोवला आहे.

**प्रभागनिहाय विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे :** प्रभाग १ : नितीन भगवान महाजन अपक्ष(१५८४), सपना योगेश महाजन भाजप (१५१५), प्रभाग २ : राजेश सुधाकर शिंदे भाजप( १३८३) जयश्री नितीन महाजन भाजप (बिनविरोध), प्रभाग ३ : अरुण दत्तात्रय आस्वार भाजप (१०६१) योगिता भूषण महाजन भाजप(१४५७), प्रभाग ४ : अर्चना योगेश पाटील भाजप (१४११) गणेश प्रभाकर पाटील भाजप (१३८२), प्रभाग ५ : नरेंद्र विशवनाथ वाघ राष्ट्रवादी(७२२) सालेहा कौसर अल्ताफ खान राष्ट्रवादी(९००), प्रभाग ६ : सुमय्या बी जाविद राष्ट्रवादी(२२६८) आसिफ मोहम्मद दारा मोहंमद राष्ट्रवादी(२११८), प्रभाग ७ : सानिया परवीन शेख साऊद राष्ट्रवादी(७६९) मोहम्मद समी मोहम्मद आसिफ राष्ट्रवादी(८२२), प्रभाग ८ : रुबीनाबी इरफान शेख राष्ट्रवादी(७३१) शेख सादिक अब्दुल नबी राष्ट्रवादी(८३१), प्रभाग ९ : शाहीन परवीन सफदार काँग्रेस(८४८) दारा मोहंमद जाफर मोहंमद राष्ट्रवादी(७५३), प्रभाग १० : अनिता मुरलीधर तायडे काँग्रेस(५२२), गोपाळ रत्नाकर बिरपण राष्ट्रवादी(६४२), प्रभाग ११ : सीमा आरिफ जमादार भाजप(५४७), गणेश सोपान पाटील राष्ट्रवादी श. पवार(६२२), प्रभाग १२ : प्रमिला चुडामन पाटील अपक्ष(१०६२) राजेंद्र पंढरीनाथ चौधरी भाजप(१३४८).

# यावलच्या नगराध्यक्षपदी उबाठाच्या छाया पाटील यांचा विजय

## भाजपाच्या रोहिणी फेगडे यांचा पराभव

प्रतिनिधी । यावल

**नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या उमेदवार छाया अतुल पाटील यांनी निर्णायक विजय मिळवत शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवून आणली आहे. त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार रोहिणी उमाकांत फेगडे यांचा सुमारे पाच हजारांहून अधिक मतांनी पराभव करत नगराध्यक्षपदाची विजयी माळ गळ्यात घातली आहे.**

यावल नगरपालिकेसाठी दि.२ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. मात्र विविध कारणांमुळे मतमोजणीला तब्बल १९ दिवसांचा विलंब झाला. अखेर रविवार, दि. २१ डिसेंबर रोजी यावल तहसील कार्यालयात मतमोजणी प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मोहनमाला नाझिरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही मतमोजणी शांततेत पूर्ण करण्यात आली.

निकालानुसार उबाठा गटाच्या सौ. छाया अतुल पाटील यांनी एकूण १४ हजार ५० मते मिळवली, तर भाजपच्या रोहिणी उमाकांत फेगडे यांना त्यापेक्षा सुमारे पाच हजारांहून कमी मते मिळाली. या मोठ्या मताधिक्यामुळे छाया पाटील यांचा विजय दणदणीत ठरला असून, त्यांनी यावल नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले आहे.

विजयाची अधिकृत घोषणा होताच मतमोजणी केंद्राबाहेर जमलेल्या शेकडो समर्थकांनी जल्लोष केला. ढोल-ताशे, फटाके आणि जोरदार घोषणाबाजी करत समर्थकांनी आनंद व्यक्त केला. यावल शहरात उबाठा गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

मतमोजणी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडली.

या विजयामुळे यावल नगरपालिकेतील राजकीय समीकरणे बदलली असून, आगामी काळात शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून छाया पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली असून, त्यांनी मतदारांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

थोडक्यात, यावल नगरपालिकेच्या नगराध्यक्ष निवडणुकीत उबाठा गटाच्या सौ. छाया अतुल पाटील यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत भाजपला धक्का दिला असून, यावलच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे.

# मुक्ताईनगर नगरपंचायतीत शिंदेसेनेचा झेंडा

## रक्षा खडसे यांना मोठा धक्का

प्रतिनिधी । मुक्ताईनगर







**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींचे निकाल आज, २१ डिसेंबर रोजी जाहीर झाले. अनेक ठिकाणी महायुतीला मतदारांनी पसंती दिल्याचे चित्र असताना, जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर नगरपंचायतीच्या निकालाने मात्र राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.**

मुक्ताईनगर नगरपंचायतीची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली होती. या निवडणुकीत भाजप नेत्या व केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. भाजपकडून नगराध्यक्षपदासाठी भावना महाजन यांना उमेदवारी देण्यात आली होती, तर शिंदेसेनेकडून आमदार चंद्रकांत पाटील यांच्या कन्या संजना चंद्रकांत पाटील या रिंगणात होत्या.

निकालात संजना पाटील यांनी २५८३ मतांनी दणदणीत विजय मिळवत नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले आहे. त्यांच्या विजयानंतर समर्थकांकडून मोठ्या प्रमाणात जल्लोष करण्यात आला. या निवडणुकीसाठी रक्षा खडसे यांनी स्वतः प्रचाराची सूत्रे हाती घेतली होती. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी, टोकाची टीका आणि विविध वादांमुळे ही निवडणूक चांगलीच गाजली होती. मात्र, अखेरीस मतदारांनी संजना पाटील यांच्यावर विश्वास दाखवला.

विशेष म्हणजे, शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनीही भाजपला पाठिंबा दिला होता. तरीदेखील झालेल्या पराभवामुळे मुक्ताईनगरचा हा निकाल खडसे परिवारासाठी राजकीयदृष्ट्या मोठा धक्का मानला जात आहे.

# शेंदुर्णीच्या नगराध्यक्षपदी भाजपचे गोविंद अग्रवाल विजयी; महाविकास आघाडीने दिली जोरदार लढत

प्रतिनिधी । शेंदुर्णी ता.जामनेर

**शेंदुर्णी नगरपंचायती साठी झालेल्या निवडणुकीच्या आजच्या निकालात भाजपने हॅट्रीक करत सलग तिसऱ्यांदा आपली एकहाती सत्ता स्थापन केली असुन महाविकास आघाडीने सुद्धा जोरदार लढत दिली असुन पहिल्यांदाच अपक्ष उमेदवार यांनी नगरपंचायत मध्ये प्रवेश केला असुन भाजपचे काही दिग्गज नेते यांना मात्र पराभवाचा सामना करावा लागला असुन वेगवेगळ्या कारणांनी ही निवडणुक शेंदुर्णीच्या राजकारणात दिर्घकाळ परिणाम करणारी ठरणार आहे.**



भाजपचे अधिकृत ८ उमेदवार विजयी झाले असुन ३ अपक्ष उमेदवार निवडुन आले आहे त्यात एक अपक्ष उमेदवार या बिनविरोध आलेल्या असुन त्यांनी भाजपात अधिकृत प्रवेश झाला आहे तर एका अपक्षास भाजपने पुरस्कृत केले आहे तर एक अपक्ष उमेदवार हे भाजपचे कार्यकर्ते राहिलेले आहे त्यामुळे सध्या भाजपकडे ११ नगरसेवक झाले असुन महाविकास आघाडीचे यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे ४ इंदिरा काँग्रेस चे २ उमेदवार विजयी झाले असुन नगराध्यक्ष म्हणुन भाजपचे गोविंद अग्रवाल विजयी झाले असुन उ.बा.ठा व शिवसेना यांना मात्र खातेही उघडता आलेले नाही.

शेंदुर्णी नगरपंचायत मध्ये २०४५३ एकुण मतदान होते यापैकी १४२९३ म्हणजे ६९.८८ टक्के मतदान झाले होते. नगराध्यक्षपदासाठी मुख्य लढत भाजपचे ज्येष्ठ नेते गोविंद अग्रवाल व महाविकास आघाडीच्या वतीने सौ.उज्वला काशिद यांच्या मध्ये थेट झाली.२ अपक्ष उमेदवार सुद्धा रिंगणात होते मात्र रविंद्र पवार यांना व शेख अब्दुल मुनाफ सरवर यांनी सुद्धा लक्षणीय मते घेतली आहे. नगराध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार गोविंदअग्रवाल यांना ७१७० तर महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ.उज्वला काशिद यांना ६५५९ मते मिळाली असुन गोविंद अग्रवाल हे ६११ मतांनी विजयी झाले आहेत.सलग तिसऱ्या वेळी जनतेने भाजपच्या ताब्यात नगरपंचायत दिली आहे एक वेळ ग्रामपंचायत व आता सलग दुसऱ्यांदा नगरपंचायत मध्ये भाजपने आपली सत्ता अबाधित ठेवली आहे.

गल्ली पासुन दिल्लीपर्यंत एकहाती भाजपची सत्ता असतानाही भाजपचे संकटमोचक ना.गिरिष महाजन यांच्या मतदारसंघात केलेली कोट्यवधी रुपयांची

**शेंदुर्णी नगरपंचायतीच्या निवडणुकीत जनतेने दिलेला**



**हा कौल शेंदुर्णी नगरीतील सर्व जनतेस मतदारांना तसेच नेते कार्यकर्ते पदाधिकारी व भाजपच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी मदत सहकार्य करणाऱ्या चया प्रती समर्पित करत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आपचे नेते ना.गिरिष महाजन यांच्या विकासकामांना जनतेने दिलेला कौल मान्य असुन आगामी काळात सबका साथ सबका विकास याच पद्धतीने शेंदुर्णी नगरीचा अजुन मोठ्या प्रमाणावर विकासासाठी प्रयत्न करणार असुन सगळ्यांनी सहकार्य करावे असे आवाहन नवनियुक्त नगराध्यक्ष भाजपचे ज्येष्ठ नेते गोविंद अग्रवाल यांनी केले आहे.**

विकासकामे शेंदुर्णी शहरात सुद्धा झालेली कामे,पक्षाचे मजबुत संघटन मात्र नेत्यांमध्ये असलेली स्पर्धा व तिकीट वाटपात झालेला गोंधळ दिरंगाई इच्छुकांची नाराजी ,प्रचारात जरी दिसत असले तरी नाराजी मतपेटीतुन व्यक्त त्यांनी केली असल्याचे निकालांवरुन दिसत आहे.

ही निवडणुक शेंदुर्णी च्या राजकारणात दिर्घकाळ परिणाम करणारी असुन भाजपचे एवढं मजबुत संघटन नेते पदाधिकारी कार्यकर्ते असतांनाही महाविकास आघाडीने दिलेली लढत भाजपसाठी आत्मचिंतन करायला लावणारी आहे.भाजपचे शांताराम गुजर, राजेंद्र भारुडे निलेश थोरात किरण बारी या दिग्गज उमेदवार यांना पराभवाचा सामना करावा लागला असुन गुजर सुर्यवंशी समाज बहुसंख्येने असतांनाही समाजाचा एकही उमेदवार निवडुन आलेला नाही. मुस्लिम बहुल प्रभागांमध्ये सुद्धा भाजपला अपेक्षित मते मिळाली नाही.बऱ्याच प्रभागांमध्ये उमेदवारांबाबत नाराजी होती मात्र पक्षाने त्यांना पुन्हा संधी दिली होती मतदारांनी मात्र आपली नाराजी मतपेटीतुन व्यक्त केली.

नगराध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार भाजपने जेष्ठ नेते गोविंद

## भाजपचे दिग्गज पराभुत

अग्रवाल हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावंत स्वयंसेवक असुन आणिबाणीच्या काळात त्यांनी कारावास भोगला असुन भाजपचे ज्येष्ठ नेते म्हणुन गोविंद अग्रवाल यांचे कार्य मोठे आहे.सगळ्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारे सदैव उपलब्ध होणारे व तात्काळ काम , नियोजन,संघटन कौशल्य व ना.गिरिशभाऊ महाजन यांचे सहकार्य यामुळे भविष्यात शेंदुर्णीत विकासाची अजुन कोट्यवधी रुपयांची कामे होणार आहे. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी बोदवड येथील तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळ व सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी मुख्याधिकारी व प्रशासक विवेक धांडे यांनी काम बघीतले यावेळी पहुर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे शेंदुर्णी दुर क्षेत्राचे पोलीस उपनिरीक्षक नंदकुमार शिंब्रे तसेच पोलिस बांधव, नगरपंचायत कर्मचारी यांनी सहकार्य केले.